प्रती,
संगणक विभाग
महा नगर पालिका
छ. संभाजी नगर

दि- 26-05-2
जा. क्र. 9/मनपा/छ.शि.म.पु/2023

उपायुक्त -२

तथा कक्षप्रमुख ( इ -प्रशासन )महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

विषय:- आपले पत्र संदर्भ जा क्र म न पा /संगणक ( इ - गव्हर्नन्स ) /४१/२०२३ अनुसार माहिती

आपले पत्र संदर्भ जा क्र म न पा /संगणक ( इ - गव्हर्नन्स ) /४१/२०२३ अनुसार श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालय येथे असणाऱ्या सर्व सुविधा यांची माहिती व प्रवेश फी चा तपशील देण्यात येत आहे

१) संग्रहालयाची माहिती असलेली माहिती पुस्तिका सोबत जोडलेल्या आहेत

अ ) -5- पानी पुस्तिका छाया प्रत

ब ) संग्रहालयाची पहिले माहिती पत्रक मूळ प्रत

क ) संग्रहालयाचे दुसरे माहिती पत्रक रंगीत छाया प्रत

२) संग्रहालयातील प्रवेश फी खाली नमूद केल्या प्रमाणे आहे .

अ ) मोठ्यांसाठी रुपये ५ ( अक्षरी रुपये पाच )

ब ) मुलांसाठी रुपये २ ( अक्षरी रुपये दोन )

3) संग्रहालयातील उपलब्ध सुविधा

संग्रहालयात पाच दालनात संग्रह प्रदर्शित केलेला असून प्रतिदालन एक दालन सहाय्यक नियुक्त आहे . संबंधित दालनातील वस्तूंची माहिती सदर कर्मचारी देऊ शकतो .

४) संग्रहालय परिसरात श्री तुळजाभवानी आई श्री छत्रपती शिवाजी महाराज याना भवानी तलवार देत असतानाचे ब्रॉन्झ धातूचे मनोवेधक शिल्प रतन बगले यांनी तयार केलेले आहे . तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचे अंगरक्षक श्री जीवा महाले यांचा अर्धपुतळा देखील संग्रहालय परिसरात बसवलेला असून संग्रहालयाची आकर्षणे आहेत

आक्र/मनपा/संगणक/[2]
दि.26/05/2023

संचालक
श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज
पुराणवस्तू संग्रहालय
महानगरपालिका, औरंगाबाद.

# श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय

## // संक्षिप्त माहिती //

महानगर पालिका, औरंगाबाद.

# छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय

## टिप्पणी

औरंगाबाद शहर हे एक ऐतिहासीक व झपाट्याने वाढणारे असल्यामुळे या ठिकाणी पर्यटकांच्या व शहरातील नागरीकांच्या मनोरंजनाकरीतां विविध प्रकल्प महानगरपालिकेने राबविले आहेत. पैकी सिद्धार्थ उद्यान, स्मृतीवन, प्राणी संग्रहालय मत्स्यालय इत्यादी होय.

शहराचा वाढता विकास, शहरामध्ये व परिसरात असलेले पाणचक्की, बीबी का मकबरा, जगप्रसिध्द अजिंठा व वेरूळच्या लेण्या, पैठणचे धरण व ज्ञानेश्वर उद्यान इत्यादी स्थळांस विविध ठिकाणावरून भेट देणा–या पर्यटकांमुळे आतां हे पर्यटकांचे शहर म्हणुन संबोधले जात आहे.

या पर्यटकांच्या शहरामध्ये महानगरपालिकेने सन 1991–92 साली तीन विविध प्रकारचे संग्रहालय व संशोधन केंद्र उभारण्याचे आयोजिले. त्या पैकी श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय हे एक होय. तीन प्रकल्पांपैकी डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर हे पुर्ण झाले असून,मौ.अबुल कलाम आझाद संशोधन केंद्राचे काम नुकतेच सुरू केले असून प्रगतीपथावर आहे.

छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालयाच्या इमारतीचे काम मार्च,1996 मध्ये सुरू करण्यांत आले असून, मार्च, 1998 पर्यंत पुर्ण झाले आहे. तसेच संग्रहालय उभारणीचे काम देखील पुर्ण झालेले आहे.

व्ही.आय.पी.रस्त्यावर सुभेदारी विश्रामगृहालगत नेहरू बालोद्यान येथे या संग्रहालयाची इमारत सहा दालनाच्या माध्यमातुन उभारण्यात आली आहे. विदेशी पर्यटकांना भारतीय संस्कृतीचे दर्शन घडावे, तसेच पूर्वजनांचे राहणीमान, त्यांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, व सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करता यावा, या दृष्टीने विविध दालनांची उभारणी करण्यांत आली आहे.

..........2

प्रस्तुत संग्रहालयातील विविध दालन उभारणी करीतां तसेच आंतील व बाहेरील परिसरास ऐतिहासीक स्वरूप देणेकरीतां शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी वेळोवेळी पाहणी करून मार्गदर्शन केले आहे. आणि त्यांच्याच मार्गदर्शना–खाली संग्रहालय उभारणीची बहुतांश कामे पार पाडण्यांत आलेली आहेत. तसेच या कामी इतिहासतज्ज्ञ डॉ.मोरवंचीकर, पुरातत्व खात्याचे पी.एन.कांबळे, रेवणसिद्ध लामतुरे, व संग्रहालयाचे संचालक डॉ.पुरवार यांचा मोलाचा वाटा आहे.

संग्रहालयाच्या इमारतीमध्ये 25' / 50' आकारमानाचे एकुण सहा दालन बांधले असून, दालननिहाय उभारणी पुढील प्रमाणे करण्यांत आलेली आहे.

दालन कमांक 1 :–

या दालनास स्वागत कक्ष तथा प्रशासकीय दालन असे संबोधण्यांत आलेले असून, या दालनात संग्रहालयाचे संचालक व त्यांचा कर्मचारी वर्गाकरीतां शिवकालीन पद्धतीचे दोन कक्ष तयार करण्यांत आलेले आहेत.

दालन कमांक 2 :–

या दालनामध्ये ऐतिहासीक शस्त्रे, जसे बंदुकी, तलवारी, ढाली, भाले, चिलखत, जरीटोप, तोफा, तोफ गोळे इ. ठेवण्यांत आलेले आहेत.

दालन कमांक 3 :–

सदर दालनात मराठा कालीन सामान्य जनजिवन दर्शविण्यांत आले आहे. मराठा कालीन दरवाजे व दैनंदिन वापरात येणा–या वस्तु जसे, तांबे, लोटे, गंगाजळी, दिवे, देव्हा–यातील देव इ. प्रकारच्या वस्तुंची मांडणी केली आहे.

दालन कमांक 4 :–

या दालनामध्ये सातवाहन काळापासुन ते ब्रिटीश काळापर्यंत /शिवकाळासह/ सर्व प्रकारची नाणी ठेवण्यांत आली आहे. तसेच निरनिराळ्या किल्ल्यांच्या पारदर्शीत चित्रे लावण्यांत आले आहे.

दालन कमांक 5 :– या दालनास मराठा सरदारांचा उदय असे संबोंधण्यांत आले असून, त्याच काळातील वस्तू, उदा. नाना प्रकारचे अडकित्ते, दिवे, पानपुडे, हुक्के इ.बाबी ठेवण्यांत आल्या आहेत.

..............3/–

<u>दालन कमांक 6</u> :— या दालनात सातवाहन कालीन वस्तु व मुर्त्या ठेवण्यांत आल्या आहेत. उदा. खेळणी, नरसिंहाची मुर्ती, लज्जा गौरी, पुरूषाकृती, विविध प्रकारच्या स्त्रीयांच्या शिराच्या आकृत्या, इ. या दालनातील सर्व वस्तु/मुर्त्यांचे अवलोकन केल्यास सातवाहन काळातील कलेबाबत संपुर्ण कल्पना येते. ✡ -

दालन कमांक 2 ते 5 मधील वस्तु डॉ.पुरवार यांनी, तसेच दालन कमांक 6 मधील वस्तु श्री.रेवणसिद्ध लामतुरे यांनी कांही शर्ती व अटींवर महानगरपालिकेस विनामोबदला दिल्या आहेत. ✱ -

संग्रहालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर दोन्ही बाजुस दोन फायबरच्या द्वारांवर दोन्ही बाजुस दोन तोफा तयार करून ठेवण्यंत आल्या आहेत. तसेच दोन्ही बाजुच्या दोन उपलद्ध गाळ्यांमध्ये नगारा व रणभेरी वाजवणा–या मावळ्यांच्या प्रतिकृती ठेवण्यांत आल्या आहेत.

संग्रहालयाच्या दालनाच्या बाहेरील बाजुस फायबर मध्ये छत्रपतींच्या जिवनावरील विविध प्रसंग म्युरलस द्वारे रेखाटण्यांत आले आहेत. प्रसंग पुढील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| 1. स्वराज्याची शपथ | 4. छत्रपती व अफजलखॉं भेट |
| 2. सोन्याचा नांगर | 5. छत्रपती संतांसंगे |
| 3. कोंडाणा किल्ला | 6. राज्याभिषेक प्रसंग |

नोट :— भवानी माता छत्रपतींना तलवार देतांनाची ब्रॉंझ धातुची मुर्ती ~~अद्याप बनविण्याचे काम चालु आहे~~. बसवण्यात आलेली आहे

संग्रहालयाच्या इमारतीस, कुंपण भिंतीस तसेच मुख्य आंतील व बाहेरील प्रवेशद्वारांना ऐतिहासीक स्वरूप देण्याचा प्रयत्न विविध तज्ञांचे मार्गदर्शनाखाली करण्यांत आला आहे.

संग्रहालयाच्या इमारतीच्या बांधकामावर जवळजवळ रक्कम रू.1कोटी व कॅबीनेट शो केस, फर्निचर, किल्ल्याचे पारदर्शिका, तोफगाडे, म्युरल्स, मावळे, फायबर तोफ, व इतर सर्व बाबींवरील खर्च जवळ जवळ रक्कम रूपये 60 लक्ष म्हणजेच, एकुण रक्कम रूपये 1.60 कोटी करण्यांत आला आहे.

✱ याच दालनात श्री.रमेश कळवळे यांनी संग्रहालयाकडे करारावर 25 वर्षासाठी दोनशेची नाणी ठेवलेली आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय कामनिहाय खर्चाचा तपशील

| अ.क्र | कामाचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| 01. | इमारत, कुंपण, भिंत व परीसराचे काम | 1.00 कोटी |
| 02. | फर्नीचर | 0.25 कोटी |
| 03. | म्युरल्स मुर्त्या, मावळे, तोफ इ. | 0.20 कोटी |
| 04. | भवानी माता छत्रपतींना तलवार देतांना ब्रॉझची मुर्ती | 0.05 कोटी |
| 05. | इतर कामावरील खर्च | 0.10 कोटी |
| | .. | 1.60 कोटी |

# औरंगाबाद महानगर पालिका औरंगाबाद.





## श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालय
## औरंगाबाद

# इमारतीचा तपशील

**प्रकल्पावरील खर्च :**

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | इमारत बांधकाम व संग्रहालय उभारणी | एकूण | १९४.०० लक्ष |
| २) | इमारतीचे एकूण बांधीव क्षेत्र | | ११०८.०० चौ.मी. |
| | दालनाची संख्या | | ६ |

## संग्रहालय उभारणीचा उद्देश

औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक शहर असून एक ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या या शहरात गतकालातील इतिहासाच्या स्मृती आजही वेरुळ लेणी, औरंगाबाद लेणी, अजिंठा लेणी, बिबीका मकबरा, पाणचक्कीच्या रुपाने सांस्कृतिक परंपरेची साक्ष देत दिमाखाने उभ्या आहेत. औरंगाबाद शहरात देशी विदेशी पर्यटकांचा नेहमीच ओढा असतो, या देशातील अबाल, वृद्ध व विशेषत: तरुणांना शिवाजी महाराजाच्या कार्य कुशल नेतृत्वाच्या आठवणीने प्रेरणा मिळावी हा उच्च, उदात्त दृष्टीकोन ठेवून महानगर पालिका औरंगाबादने श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालयाची उभारणी केली आहे. संग्रहालयाची उभारणी सहा दालनाच्या माध्यमातून झाली असून देशी व विदेशी पर्यटकांना शिवकालीन संस्कृतीचे दर्शन घडावे, तसेच शिवकालीन राहणीमान त्यांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करता यावा या दृष्टीने हे संग्रहालय उभारले आहे. छत्रपतीचे जागतिक व्यक्तीमत्व विविध तत्कालीन व आधुनिक राजकारण्यांच्या विचारांच्या माध्यमातून दृष्टीस पडते. तत्कालीन राजे महाराजे यांच्या व्यक्तीमत्त्वाच्या विरुद्ध स्वतंत्र दृष्टीने सर्वांगिण विचार करणारा, पहिले नौदल उभारणारा व विदेशी साम्राज्य विस्तार करणाऱ्या शक्तींना अंकुश बसवणारा, प्रजाहीत वत्सल राजा या संग्रहालयातून दाखविण्याचा प्रयत्न संग्रहालय उभारुन महापालिकेने केला आहे.

## श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालयाची वैशिष्ट्ये

१) दालन क्र. १) या दालनास स्वागत कक्ष तथा प्रशासकीय दालन संबोधण्यात आले असून या दालनात संग्रहालयाचे संचालक व कर्मचारी वर्गकरीता शिवकालीन जुन्या लाकडी वास्तूशिल्प पद्धतीने दोन कक्ष तयार करण्यात आले आहेत.

२) दालन क्र. २) **शिवरायांची युद्धनिती :** या दालनात ऐतिहासिक शस्त्रे जसे बंदुकी, तलवारी, ढाली, भाले, चिलखत, जरीटोप, तोफा, गोळे इ. ठेवण्यात आले आहेत.

दालन क्र. २ अ) **किल्ले स्वराज्याचा आत्मा :** या दालनात महाराजांच्या कारकिर्दीतील किल्ल्यांची छायाचित्रे लावण्यात आली आहेत. जसे तोरणा, लोहगड विंचूटोक, कल्याण दरवाजा, पन्हाळगड, रायगड, सिंहगड, तोरणा झुंजार माची, तोरणा बालेकिल्ला इत्यादी या दालनावरून शिवकालीन वास्तूशास्त्राची कल्पना येते.

३) दालन क्र. ३) **मराठाकालीन जीवन :** या दालनात मराठा कालीन सामान्य जनजीवन दर्शविण्यात आले आहे. मराठाकालीन दरवाजे व दैनंदिन वापरात येणाऱ्या वस्तू जसे तांबे, लोटे, गंगाजळी, दिवे, देव्हाऱ्यातील देव इ. प्रकारच्या वस्तूंची मांडणी केली आहे.

४) दालन क्र. ४) **नाण्यांतून महाराष्ट्र :** या दालनामध्ये सातवाहन काळापासून ते ब्रिटीश काळापर्यंत शिवकाळासह / सर्व प्रकारची नाणी ठेवण्यात आली आहेत. तसेच किल्ल्यांची पारदर्शीत चित्रे लावण्यात आली आहेत. या दालनातच छत्रपती संभाजीराजे शाहु महाराज यांची अस्सल फर्माने प्रदर्शित आहेत.

५) दालन क्र. ५) **मराठे सरदारांचा उदय :** या दालनात त्याच काळातील वस्तू उदा. नाना प्रकारचे अडकित्ते, दिवे, पानपुडे, हुक्के इ. बाबी ठेवण्यात आल्या आहेत.

६) दालन क्र. ६) **सातवाहन दालन :** या दालनात सातवाहन कालीन वस्तू व मूर्त्या ठेवण्यात आल्या आहेत. उदा. खेळणी, नरसिंहाची मूर्ती, लज्जा गौरी, पुरुषाकृती विविध प्रकारच्या शिरांच्या आकृत्या इ. या दालनातील सर्व वस्तू मूर्त्यांचे अवलोकन केल्यास सातवाहन काळातील कलेबाबत संपूर्ण कल्पना येते.

पुराणवस्तू संग्रहालयामधील दा.क्र. २ ते ५ मधील सर्व वस्तू डॉ. शांतीलाल पुरवार यांनी विना मोबदला दिल्या असून अंतर्गत मांडणी व रचना त्यांच्या कल्पनेची आहे. व दालन क्र. ६ मधील सातवाहन कालीन वस्तू श्री. रेवण सिद्ध लामतुरे यांनी विना मोबदला दिल्या आहेत.

**संग्रहालयाचा परिसर :** संग्रहालयाच्या आतील भागात श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील ऐतिहासिक प्रसंग ''फायबर म्यूरल्स''च्या माध्यमातून उभे केले आहेत. जसे
१) रोहीडेश्वरावरील स्वराज्याची शपथ, २) आधि लगीन कोंडाण्याचे, ३) सोन्याचा नांगर, रांजण्याच्या पाटलाला शिक्षा, सोन्याच्या मोहरा, ४) अफझलखानाचा वध, ५) संताच्या संगे शिवाजी महाराज, ६) शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक. सदर फायबर शिल्पाकृती या आदरणीय बाबासाहेब पुरंदरे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आली असून या शिल्पावर प्रकाशाच्या व शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या आवाजाच्या माध्यमातून शिवकालीन प्रसंगाची माहिती प्रेक्षकांना मिळावी या उद्देशाने एक छोटासा प्रयोग सादर केला जाणार आहे.

संग्रहालयाच्या मध्यभागी चौथऱ्यावर भवानी माता छत्रपतींना भवानी तलवार देतानाचे ब्रांझचे धातुशिल्प उभारण्याचे कार्य प्रगती पथावर आहे.

संग्रहालयाच्या बाहेरील भागात सुंदर बाग तयार करण्यात आली असून परिसर रम्य करण्यात आला आहे.

---

| | | |
|---|---|---|
| **प्रकल्पाचे** | अतिरिक्त शहर अभियंता | **श्री. सी.एस. सोनी** |
| | उप अभियंता | **इंजि. खमर शेख** |
| | उप अभियंता | **एस.डी. पानझडे** |
| | वास्तुशास्त्रज्ञ | **दिपक देशपांडे** |
| | गुत्तेदार | **मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कं.लि.** |





नृसिंहाचे चित्र



श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालय,
नेहरु बाल उद्यान, सुभेदारी विश्रामगृहा जवळ,
औरंगाबाद-431 001 Ph. : 0240 - 2334087

संग्रहालयाच्या वेळा : सकाळी १०.३० ते १.३०, दुपारी ३.०० ते ६.००
तिकीट दर प्रौढांसाठी रु. ५/- विद्यार्थी व लहान मुले रु. २/-

गुरुवारी संग्रहालय बंद


: प्रकाशक :
पर्यटन कक्ष
औरंगाबाद महानगर पालिका औरंगाबाद.
दुरध्वनी - 0240 - 2333536 ते 40 Ext. No. : 221.


निश्चयाचा महामेरु । बहुतजनांसी आधारु
अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी.



# श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालय औरंगाबाद.

औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

## शिवरायांची युद्धनिती :



धर्मनिरपेक्षता, राजकीय सहिष्णुता, दुरदृष्टी, देशभक्ती आणि सर्व मानवांवर प्रेम पण त्याचवेळी अन्यायाची विलक्षण चीड यांचा अपुर्व संगम असलेला आदर्श राजा म्हणजे 'छत्रपती शिवाजी महाराज' कमीत कमी सैन्य आणि साधन सामग्री निशी कमीत कमी वेळात शत्रुचा पराभव हे त्यांच्या जिवनाचे सूत्र होते आणि त्यासाठी राजांनी गनिमी काव्याचा यशस्वीरित्या अवलंब केला होता.

महाराजांची शस्त्रे म्हणजे स्वदेशी लोहाराच्या परिश्रमातून तयार झालेली हत्यारे. भाले, सांग, माडू, गुर्ज, विटा, त्रिक, एक धारेच्या व दोन धारेच्या तलवारी आणि वाघनखे.

## किल्ले - स्वराज्याचा आत्मा :



१६५७ मध्ये कल्याण भिवंडी जिंकू न महाराजांनी स्वराज्याच्या आरमाराचा शुभारंभ केला. किल्ले हा स्वराज्याचा आत्मा. डोंगर आणि सागरी किनाऱ्यांचा अचूक उपयोग करीत राजांनी रायगड, राजगड, सिंधूदुर्ग, विजयदुर्ग या सारख्या अभेद्य गडांची व दुर्गांची निर्मिती केली. संग्रहालयाच्या क्रमांक एकच्या दालनातून आपणांस शिवाजी महाराजांच्या रणकौशल्याचे दर्शन घडते.

## मराठाकालीन जनजीवन :



तत्कालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक जिवनाचे दर्शन क्रमांक दोनच्या दालनातील वस्तुंच्या माध्यमातुन घडते. गरुड, व्याघ्र, यांच्या आकारातील लोखंडी दिवे; मत्स्य, कच्छ, वराह, नृसिंह या दशावरातील विविध प्रकारची पुजापात्रे, जलपात्रे म्हणजे मानवी उत्क्रांतीचे टप्पेच होत. वनस्पती, माती यांच्यापासून तयार झालेल्या रंगातून चितारलेली रंगीत चित्रे आपलं मन मोहवून टाकतात.

## नाण्यातुन महाराष्ट्र :



तीन क्रमांकाच्या या दालनात आपणास इ.स. पूर्व सहाशेतील नाण्यापासुन ते बहामनी, निजामशाही, आदिलशाही, बरीदशाही, कुतुबशाही आदी काळातील दुर्मीळ नाण्या बरोबरच छत्रपतींच्या काळातील विविध टाकसाळीतील शिवराई नाणी पहावयास मिळतात.

## मराठे सरदारांचा उदय :



चौथ्या दालनात आपणास बघता येईल मराठे सरदारांचे वैभव दर्शविणारी दिवालगीरी, बिदरी काम असलेला हुक्का, पानपुडे, अडकित्ते, आदी शिवकालीन हस्त कौशल्याचे नमुने. वस्त्र प्रावरणांच्या बाबतीत सुध्दा शिवकाळातील समृध्दी पैठण्या, फेटा, किमखाब, आदितून लक्षात येतेच. याच दालनात एकनाथी भागवत, ज्ञानेश्वरी, गुरुचरित्र इत्यादी हस्तलिखीतेही आपल्याला बघायला मिळतात.

छत्रपतींचा जन्म १६३० सालचा. १६४५ साली राजांनी लोककल्याणासाठी राजमुद्रा काढली.



१६४५-४६ साली तोरणा किल्ला सर करुन छत्रपतींनी स्वराज्याचे तोरण बांधले.
१६५७ ला राजांनी नौदल सुरु केले. पन्नास वर्षाच्या अथक परिश्रमानंतर एक स्वतंत्र, सार्वभौम राज्याची उभारणी करुन २ एप्रिल १६८० ला रायगडावर राजांनी चिरविश्रांती घेतली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जिवन कार्याशी निगडीत असणाऱ्या विविध प्रसंगातुन आजही वर्तमान काळातही एक खंबीर आणि बलाढ्या स्वराज्य निर्माण करावे अशी प्रेरणा आपणा सर्वांना मिळावी म्हणुनच या पुराणवस्तु संग्रहालयाची निर्मीती करण्यात आली आहे.

डॉ. शांतीलाल पुरवार यांच्या संग्रहातील ३००० वस्तुंद्वारे हे 'शिवविश्व' उभारले गेले. रामलिंग अप्पा लामतुरे यांनी सातवाहन काळातील मृण्मयी मुर्ती खेळणी, आभुषणे आदि अमुल्य वस्तू देऊन हे संग्रहालय समृध्द करण्यास हातभार लावला. श्रीमान योगी असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुराणवस्तू संग्रहालयास संशोधकांनी आणि सर्व नागरिकांनी भेट देवुन इतिहासाचा हा महान वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहचवण्यास हातभार लावावा हीच अपेक्षा.

जा.क्र./मनपा/अशाद/2023/ 2
छत्रपती संभाजीनगर महानगरपालि
दिनांक :- 22.05.2023

प्रति,
सिस्टीम मॅनेजर,
संगणक विभाग
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

विषय :- सर्व विभागांची माहिती वेबसाईटवर अद्यावत करणे बाबत.
संदर्भ :- जा.क्र.मनपा/संगणक/ई-गव्हर्नन्स/2023/41 दि.15/05/2023.

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची वेबसाईट अद्ययावत करण्यासाठी अग्निशमन विभागातील माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

अग्निशमन विभागात सद्यस्थितीत तीन अग्निशमन केंद्र कार्यान्वित असून एन 9 येथील केंद्राचे लोकापर्ण दि.13.04.2023 रोजी करण्यात आलेले आहे. तथापि कार्यरत कर्मचारी कमी असल्याने केंद्र कार्यान्वित झालेले नाही. तीन अग्निशमन केंद्रात दहा अग्निशमन वाहने आहे.

| अ. क्र. | अग्निशमन केंद्राचे नाव | अग्निशमन विभाग व आपतकालीन दुरध्वनी क्रमांक | अग्निशमन वाहने | वाहन क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 01 | मुख्य अग्निशमन कार्यालय, पदमपुरा. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका<br><br>श्री एस.बी. झनझन<br>मुख्य अग्निशमन अधिकारी<br><br>श्री आर.के.सुरे<br>अग्निशमन केंद्र अधिकारी | 101, 2334000,<br>2327401-04<br>9823270784<br><br>9823033322<br><br>9764914788 | 08 | 1.फायर टेंडर एम.एच.20 सी.टी.1470<br>2.फायर टेंडर एम.एच.20 ई.एल.3080<br>3.फायर टेंडर एम.एच.20 ई.एल.3081<br>4.फायर टेंडर एम.एच.20 ई.एल.3082<br>5.फायर टेंडर एम.एच.20 ई.एल.3499<br>6.फायर टेंडर एम.एच.20 ई.एल.3501<br>7.रेस्क्यु व्हॅन एम.एच.20 सी.टी.3231<br>8. वॉटर मिस्टमिनी टेंडर एम.एच.20 ई.एल.3080 |
| 02 | उप अग्निशमन केंद्र, सेव्हन हिल्स,जालना रोड | (0240) 2472099, | 01 | फायर टेंडर एम.एच.20 सी.टी.1468 |
| 03 | उप अग्निशमन केंद्र, एम.आय.डी.सी. चिकलठाणा, | (0240) 2474074, | 01 | फायर टेंडर एम.एच.20 सी.टी.1469 |
| 04 | उप अग्निशमन केंद्र, एन 9 सिडको, | अग्निशमन केंद्राचे लोकापर्ण दि.13.04.2023 रोजी करण्यात आलेले असून केंद्र कार्यान्वित होण्यासाठी प्रस्तावित आहे. | | |

तसेच अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र फीस तपशील सोबत जोडलेला आहे..

मुख्य अग्निशमन अधिकारी
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

प्रत :- उपआयुक्त 2 तथा कक्ष प्रमुख (ई प्रशासन),छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना माहितीस्तव सादर

आक्र/मनपा/संगणक/138
दि. 26/05/2023